| | | |
|---|---|---|
| सोलापूर विद्यापीठ<br>**परीक्षा व मुल्यमापन विभाग**<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव,<br>सोलापूर - ४१३ २५५<br>ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९<br>फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल: coe@sus.ac.in | सोलापूर विद्यापीठ<br>॥ विद्यया संपन्नता ॥<br>NAAC Accredited-2015<br>'B' Grade (CGPA 2.62) | **Solapur University**<br>**Examinations and Evaluation Section**<br>Solapur-Pune National Highway, Kegaon,<br>Solapur-413 255<br>EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79<br>Fax No.0217-2744770<br>Web Site: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>Email id: coe@sus.ac.in |

**संदर्भ क्रमांक . सोविसो/परीक्षा व मूल्यमापन विभाग /२०१७-१८/** 498 दि. - 7 MAR 2018

प्रति,

1) **मा. प्राचार्य / मा.संचालक,**
   सोलापूर विद्यापीठांशी संलग्नित
   सर्व महाविद्यालये, शैक्षणिक संकुले व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय**: विविध अभ्यासक्रमांच्या Pattern 2013 ला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संधीबाबत..

संदर्भ : विद्यापीठ अनुदान अयोगाच्या मार्गदर्शक तत्वे संदर्भातील विद्यापीठाचे पत्र क्र.991 दि.26/05/2016.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कोणतीही पदवी/पदव्यूत्तर पदवी ही विहित कालावधीत ( अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी + 2 वर्ष ) पूर्ण करावी अशा स्वरुपाच्या सूचना विद्यापीठाकडून सर्व महाविद्यालयांना देण्यात आला होत्या. बी.ए, बी.कॉम,बी.एस्सी, एम.ए, एम.एस.डब्ल्यू,एम.कॉम, एम.एस्सी या अभ्यासक्रमाच्या पॅर्टन,2013 (वर्ष-2013 पर्यंत प्रवेशित) तसेच बी.सी.ए,बी.बी.ए, बी.फार्मसी,एम.फार्मसी, डी.बी.एम,पीजीडीसीए या अभ्यासक्रमाच्या पॅर्टन -2013 (वर्ष-2013 पर्यंत प्रवेशित ) कोअर पॅर्टनच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचा 5 वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे, **अशा प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांना सदरील अभ्यासक्रमाची पदवी परीक्षा उत्तीर्ण होण्याची शेवटची संधी मार्च-2019 पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे**.

सबब, वरील उपलब्ध करुन दिलेल्या संधी मध्ये पॅर्टन 2013 च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम उत्तीर्ण होणे आवश्यक असून त्यानंतर कसल्याही प्रकारची संधी उपलब्ध करुन दिली जाणार नसल्याची नोंद घ्यावी. **उपलब्ध संधीमध्ये जे विद्यार्थ्यांची पदवी पुर्ण करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचा संबंधित अभ्यासक्रमाचा संपादणुक (PERFORMANCE ) रद्द केली जाणार आहे**, याबाबतची माहिती आपल्या महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या निर्देशनास आणून देऊन प्रस्तुत विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती. त्याचप्रमाणे सर्व संधी संपलेल्या विद्यार्थ्यांना नव्याने पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेण्याची मुभा राहील.

कळावे,

आपला विश्वासु,

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**